**<u>सत्र खटला क्र. ४४/२०२१</u>**

सरकार -वि- पुष्पा कऱ्हाळे

**निशाणी क्र. २५**

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ यांची जबानी**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,**

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | - | कोकीळा हट्टेसिंग तोमर |
| वय | - | ५८ वर्षे |
| व्यवसाय | - | ए.एस.आय. ब. नं. १५७९ |
| राहणार | - | पोलीस स्टेशन, बुलडाणा शहर, ता. जि. बुलडाणा |

**<u>सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्री. एस. पी. हिवाळे यांचे मार्फत -</u>**

दिनांक १७/०२/२०२१ रोजी मी पोलीस स्टेशन, बुलडाणा शहर येथे पोलीस हेड कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत होती. त्या दिवशी माझी स्टेशन डायरीला माझी ड्युटी होती. त्या दिवशी मी कर्तव्यावर हजर असतांना पुष्पा कऱ्हाळे ही फिर्याद देण्याकरिता आली होती. सदर फिर्याद ही तिला तिच्या पती विरुध्द द्यायची होती. त्यानंतर, मी भारतीय दंड संहिता ३२३, ५०४ व ५०६ अन्वये तिच्या पतीविरुध्द एन. सी दाखल केली. त्यानंतर, मी तिला वि. न्यायालयात दाद मागण्याची समज दिली. त्यानंतर, मी तिला हे सांगितले की, आपण घरी जावे आणि मुलांच्या व आरोपींच्या तोंडाला मास्क लावावा. पोलीस स्टेशनमध्ये ईतर आरोपी हजर असतांना तिने ईतर हजर असलेल्या आरोपीला असे म्हटले की, पोलीसवाले असेच हारामी असतात. त्यावेळी तिने मला ''मादरचोद, तु छिनाल आहे'' अशी शिवीगाळ केली. तरी देखील मी आरोपीला समजाविण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर, मी आरोपीला पोलीस स्टेशन बाहेर काढण्याचा प्रयत्न केला असता माझ्या हाताला ईजा झाली. त्या वेळेस माझ्या सोबत संतोष धंदर, दिपमाला उंबरकर रामकला सुर्वे व लक्ष्मीकांत येमले हजर होते. तिने आमच्यासोबत वाद घालून शासकीय कामामध्ये अडथळा निर्माण केला. संबंधित घटनेचा रिपोर्ट बुलडाणा शहर पोलीस स्टेशनला दिला. आता मला अभिलेखावरुन रिपोर्ट दाखविण्यात आला, त्यावर माझी सही आहे, त्यामधील मजकूर बरोबर आहे, यावेळी फिर्यादला **<u>निशाणी क्र. २६</u>** देण्यात येते. त्या अनुषंगाने प्रथम खबरी अहवाल नोंदविण्यात आला. आता मला अभिलेखावरुन छापील प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला, त्यावर माझी सही आहे, त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे, यावेळी

छापील प्रथम खबरी अहवालाला **निशाणी क्र. २७** देण्यात येते. रिपोर्ट दिल्यानंतर मला जिल्हा सामान्य रुग्णालय, बुलडाणा येथे पाठविण्यात आले. त्यानंतर, डॉक्टरांनी माझी वैद्यकीय तपासणी केली. माझ्या उजव्या खांद्याला मार लागल्याचे मी डॉक्टरांना सांगितले होते. त्यानंतर, मी पोलीसांना घटनास्थळ दाखविले. पोलीसांनी माझा घटनेविषयी जबाब नोंदविला होता.

**सरकारी वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन उर्वरित सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

दि. २२/०९/२०२५

समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत,

स्वा/-

**( आर. के. शर्मा )**

जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश

बुलडाणा